**कृपया प्रसिद्धीसाठी** **12 फेब्रुवारी 2014**

## निराशाजनक रेल्वे बजेटमध्ये मागील कामगिरीचा फसवा आढावा:राम नाईक

**मुंबई, बुधवार :** ''लेखानुदानाच्या अर्थसंकल्पात नवे काही नसते हे खरे पण असे रेल्वे बजेट सादर करताना रेल्वे मंत्र्यांनी मागील वर्षाचा जो आढावा घेतला आहे तोही फसवा आणि निराशाजनक आहे'', अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली आहे.

पाच वर्षांमध्ये डॉ. मनमोहन सिंह यांच्या मंत्रिमंडळातील हे सहावे रेल्वे मंत्री आहेत. या अस्थिरतेचे थेट प्रतिबिंब रेल्वे अर्थ संकल्पामध्ये रेल्वे मंत्री श्री. मल्लिकार्जुन खाडगे यांनी मागील वर्षाचा आढावा घेताना उमटलेले दिसत होते, असे मत व्यक्त करुन श्री. राम नाईक म्हणाले, ''उपनगरी रेल्वे प्रवाशांची काँग्रेस सरकारने नेहमीच उपेक्षा केली आहे. आज सादर झालेल्या बजेटमध्ये तर दररोज 76 लाख प्रवासी असलेल्या मुंबई उपनगरी रेल्वेचा साधा वेगळा उल्लेखही नाही. गेल्या वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेताना गेल्या रेल्वे अर्थ संकल्पात घोषणा केल्याप्रमाणे मुंबईत एसी लोकल का सुरु झाली नाही, वर्ष भरात 50 सरकते जिने व्हायला हवे होते त्याऐवजी दोनच का झाले, खाजगी व सरकारी भागीदारीत सुरु होणा-या उन्नत रेल्वे मार्ग प्रकल्पाचे वर्षभरात काय झाले अशा अनेक महत्त्वाच्या बाबींची एक अवाक्षरही माहिती न दिल्याने मुंबईकर संतप्त आहेत.''

आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसविरोधी एक गठ्ठा मतदान करुन मुंबईकर आपला संताप व्यक्त करतील असा विश्वासही श्री. राम नाईक यांनी व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**